प्रेसनोट दिनांक :— ०३.१२.२०२१

**आलोसे १)शंभुनाथ संतराम दुभळकर, वय ३० वर्षे, व्यवसाय नौकरी, महसुल सहायक, वर्ग—३, जिल्हा पुरवठा कार्यालय, जिल्हाधिकारी कार्यालय, हिंगोली रा. अंबरवाडी ता. जिंतुर जि. परभणी २)श्रीमती जमुनाबाई भ्र. रायाजी ईसाये, वय ५३ वर्षे, व्यवसाय नौकरी, शिपाई, वर्ग—४ रा. मौजे दाताडा (खुर्द) ता. सेनगाव जि. हिंगोली यांचे विरूध्द ३०,०००/—रू. च्या लाचेची मागणी करून ती रक्कम आलोसे क्र.२ यांचेहस्ते स्विकारल्या प्रकरणी गुन्हा दाखल व अटक.**

---

पिडीत तक्रारदार महिला हिने दि.०१.१२.२०२१ रोजी अॅन्टी करप्शन ब्युरो, हिंगोली येथे तक्रार दिली होती की, तक्रारदार महिला यांचे स्वस्तधान्य दुकान सन २०१७ मध्ये जिल्हा पुरवठा अधिकारी यांनी निलंबीत केले होते. त्याविरूध्द तक्रारदार महिला यांनी उप आयुक्त, पुरवठा, औरंगाबाद यांचेकडे अपील केले होते. त्यावरून उप आयुक्त पुरवठा, औरंगाबाद यांनी ज्युलै/२०२० मध्ये फेर चौकशी करून योग्य आदेश पारीत करणेबाबत आदेश दिले होते. त्यानुसार जुन/२०२१ मध्ये फेरचौकशी करून तहसिलदार, वसमत यांनी रास्तभाव दुकान पुर्ववत बहाल करणेस हरकत नाही असा अहवाल पाठविला होता.

त्यानुसार दुकान पुर्ववत चालु करणेसाठी तक्रारदार महिला पुरवठा विभागातील श्री दुभळकर यांना भेटल्या असता श्री दुभळकर यांनी परवाना नुतणीकरण व दुकान पुर्ववत चालु करण्याच्या आदेशाची फाईल तयार करून पुरवठा अधिका—यांची सही घेण्याच्या कामासाठी ३०,०००/—रू. ची लाचेची मागणी करीत असल्याची तक्रारदार महिला यांनी अॅन्टी करप्शन ब्युरो, हिंगोली येथे तक्रार दिली होती

त्यावरून अॅन्टी करप्शन ब्युरो, हिंगोली यांनी दोन शासकिय पंचा समक्ष दि.०१.१२.२०२१ रोजी तक्रारदार यांचे तक्रारीची पडताळणी केली असता यातील आलोसे यांनी तक्रारदार यांचेकडे ३०,०००/—रू. लाचेची मागणी करून ती लाचेची रक्कम दि.०३.१२.२०२१ रोजी स्विकारण्यास सहमती दर्शविली. त्यावरून दि.०३.१२.२०२१ रोजी सापळा कारवाई दरम्यान यातील आलोसे क्र. १)शंभुनाथ संतराम दुभळकर, वय ३० वर्षे, व्यवसाय नौकरी, महसुल सहायक, वर्ग—३, जिल्हा पुरवठा कार्यालय, जिल्हाधिकारी कार्यालय, हिंगोली रा. अंबरवाडी ता. जिंतुर जि. परभणी यांनी सदर लाचेची रक्कम ३०,०००/—रू. जिल्हा पुरवठा कार्यालय, हिंगोली येथील शिपाई श्रीमती जमुनाबाई भ्र. रायाजी ईसाये, वय ५३ वर्षे, व्यवसाय नौकरी, शिपाई, वर्ग—४ रा. मौजे दाताडा (खुर्द) ता. सेनगाव जि. हिंगोली यांचे मार्फतीने स्विकारली आहे.

त्यावरून आलोसे १)शंभुनाथ संतराम दुभळकर, वय ३० वर्षे, व्यवसाय नौकरी, महसुल सहायक, वर्ग—३, जिल्हा पुरवठा कार्यालय, जिल्हाधिकारी कार्यालय, हिंगोली रा. अंबरवाडी ता. जिंतुर जि. परभणी २) श्रीमती जमुनाबाई भ्र. रायाजी ईसाये, वय ५३ वर्षे, व्यवसाय नौकरी, शिपाई, वर्ग—४ रा. मौजे दाताडा (खुर्द) ता. सेनगाव जि. हिंगोली यांचे विरूध्द पोलीस स्टेशन हिंगोली शहर येथे कलम ७,१२ भ्रष्ट्राचार प्रतिबंध अधिनियम, १९८८ प्रमाणे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे.

ही कामगिरी डॉ. श्री राहुल खाडे, पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड परिक्षेत्र, नांदेड यांचे मार्गदर्शना खाली हिंगोली युनिट येथील श्री निलेश सुरडकर, पोलीस उपअधीक्षक, हिंगोली, सपोउपनि/युनुस सिध्दीकी, पोह/विजय उपरे, पोह/विजय शुक्ला, पोना/महारूद्र कबाडे, पोना/ज्ञानेश्वर पंचलिंगे, पोना/तान्हाजी मुंढे, पोना/अविनाश किर्तणकार, पोशि/राजाराम फुपाटे, मपोशि/योगीता आवचार, चापोना/हिम्मतराव सरनाईक ला.प्र.वि. हिंगोली यांनी केलेली असुन सदर गुन्हयाचा तपास श्री निलेश सुरडकर, पोलीस उपअधीक्षक, हिंगोली हे करीत आहे.

अॅन्टी करप्शन ब्युरो, हिंगोली तर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, कोणत्याही शासकीय कार्यालयामध्ये कोणी अधिकारी/कर्मचारी किंवा त्यांच्या वतीने कोणी खाजगी इसम लाचेची मागणी करीत असतील, तर कृपया अॅन्टी करप्शन ब्युरो कार्यालयाशी संपर्क साधावा. कार्यालयीन वेळेनंतर वा सुट्टीचे दिवशी अॅन्टी करप्शन ब्युरोचे कार्यप्रणाली बाबत वा तक्रारी बाबत माहिती पाहिजे असल्यास खालील मोबाईल व दुरध्वनीवर संपर्क साधावा. तसेच तक्रारदार यांना तक्रार देण्यासाठी अॅन्टी करप्शन ब्युरो मार्फत मोबाईल अॅप www.acbmaharashtra.net हे सुरू करण्यात आले आहे.

**टोल फ्री क्र. १०६४, दुरध्वनी क्र. ०२४५६—२२३०५५,**

**श्री निलेश सुरडकर, पोलीस उपअधीक्षक, हिंगोली ९८२२२००९५९**